# ललित कला केंद्र (गुरुकुल)
# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
॥ यः क्रियावान् स पण्डितः ॥

## ललित कला केंद्र, गुरुकुल विभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांकरीता अत्यंत महत्त्वाच्या सूचना

## शैक्षणिक वर्ष : २०२६-२७

**अभ्यासक्रम :**

**१. एम्.ए.बी.वाय. (संगीत) - (कोणत्याही पदवीनंतर) पदव्युत्तर पूर्व वर्ष + २ वर्षे**
**२. एम्.ए.बी.वाय. (नृत्य) - (कोणत्याही पदवीनंतर) पदव्युत्तर पूर्व वर्ष + २ वर्षे**
**३. एम्.ए.बी.वाय. (नाटक) - (कोणत्याही पदवीनंतर) पदव्युत्तर पूर्व वर्ष + २ वर्षे**

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामधील ललित कला केंद्र, गुरुकुल विभागात वरील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली असून विद्यापीठाच्या मुख्य संकेतस्थळावरुन विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी करता येणार आहे.
**(https://campus.unipune.ac.in)**

२. एम्.ए.(संगीत, नृत्य, नाटक) नियमित अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी **तीन वर्षांचा** असून कोणत्याही विषयातला पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठीची प्रवेश परीक्षा देऊ शकतात. तीन वर्षांपैकी पहिले वर्ष पदव्यूत्तर पूर्व वर्ष (MABY-MA Bridge Year) असून पुढील दोन वर्षात एम्.ए. चा अभ्यासक्रम शिकवला जाईल.

३. ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख **१५ मे २०२६** आहे. त्यानंतर कुठल्याही परिस्थीतीत अर्ज करता येणार नाही याची नोंद घ्यावी. एम्.ए.बी.वाय. **संगीत,** एम्.ए.बी. वाय. **नृत्य** तसेच एम्.ए.बी.वाय. **नाट्य** विषयाची ऑनलाईन प्रवेश परीक्षा **दि. १ ते १३ जून २०२६** या कालावधीत होईल. सविस्तर वेळापत्रक नंतर जाहिर केले जाईल.

४. **सर्व अभ्यासक्रम पूर्ण वेळाचे, व्यावसायिक, गुरुकुल पद्धतीचे आहेत. अभ्यासक्रमासाठी संपूर्ण दिवसभर विद्यापीठात उपस्थिती असणे आवश्यक आहे.** प्रवेश चाचणी (OEE : Online Entrance Examination) तसेच अभियोग्यता कलचाचणी (AAT : Audition Aptitude Test) घेऊनच विद्यार्थ्यांस प्रवेश दिला जातो. त्यासाठी संगीत, नृत्य, नाटय ह्या विषयांमध्ये किमान गुणवत्ता, पूर्वप्रशिक्षण आणि योग्य पूर्वानुभव असणे आवश्यक आहे.

५. सदर अभ्यासक्रम स्वयंनिर्वाही तत्तवांवरचे असलेमुळे शासनाद्वारे मिळणा-या कोणत्याही प्रकारच्या शिष्यवृत्तींची जबाबदारी विभागाकडे नाही. तसेच शासकीय परिपत्रकानुसार एम्.ए.बी.वाय. (संगीत, नृत्य, नाटय) या अभ्यासक्रमांसाठी केवळ SC, ST याच प्रवर्गांसाठी शासकीय शिष्यवृत्ती लागू आहे. इतर संवर्गांना कोणतीही शासकीय शिष्यवृत्ती लागू नाही याची कृपया नोंद घ्यावी.

६. ललित कला केंद्र, गुरुकुल विभागातील अभ्यासक्रमांसाठी पूर्वप्रशिक्षण आणि पुर्वानुभव आवश्यक असलेमुळे प्रवेश घेताना त्यासंबंधातील योग्य ती कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. तशी नसल्यास प्रवेश मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

७. विद्यापीठ प्रवेश प्रक्रियेनुसार विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रत्येक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली अर्हता दिलेली आहे. त्यासाठी योग्य ती कागदपत्रे सुरुवातीलाच सादर करावी लागतील. तथापी OEE व AAT झाल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या वेळी केवळ निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या कायदपत्रांची पडताळणी केली जाईल विद्यापीठ नियमांनुसार योग्य ती कागदपत्रे नसल्यास संबंधीत विद्यार्थ्याला प्रवेश मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

८. प्रवेश प्रक्रियेसाठी संकेतस्थळाचा पत्ता : **https://campus.unipune.ac.in**

**Important Websites**

1. For Registration and Application
   https://compus.unipune.ac.in

2. For more information about admission process
   www.unipune.ac.in/dept/finearts/centre_for_performing_arts/cpa_webfiles/admission.htm

**विभागप्रमुख**
ललित कला केंद्र, गुरुकुल
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# एम्.ए.बी.वाय. (संगीत, नृत्य, नाटय) : प्रात्यक्षिक परीक्षेचे स्वरूप

## ***संगीत***

### शैक्षणिक अर्हता : कोणतीही पदवी + संगीत विशारद पूर्ण अथवा समकक्ष परीक्षा उत्तीण किंवा बी.ए. (संगीत) पदवी उत्तीण

(१) **गायन** : एकूण १५ रागांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच त्यांपैकी एका रागातील तुम्हाला चांगला गाता येणारा बडा व छोटा ख्याल १५ ते २० मिनिटे सादर करण्याची क्षमता असावी व आवडीचा कोणताही उपशास्त्रीय किंवा एक सुगम संगीतप्रकार सादर करण्याची क्षमता अपेक्षित आहे.

(२) **वादन (अवनध्द वाद्य)** : एकूण ५ प्रचलित तालांची व दोन अप्रचलित तालांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच त्यांपैकी तीन प्रचलित तालामध्ये प्रत्येकी १५ ते २० मिनिटे एकलवादन करण्याची क्षमता अपेक्षित.

(३) **वादन (तंत व सुषिर वाद्य)** : किमान १५ रागांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच त्यांपैकी एका रागामध्ये मसीतखानी व रजाखानी गत १० ते १५ मिनिटे सादर करण्याची क्षमता आहे. सुगम संगीतप्रकार किंवा कोणत्याही रागातील धुन वाजवून दाखवण्याची क्षमता अपेक्षित आहे.

**सूचना : आपण निवडलेल्या राग व ताल यांची यादी सोबत असलेल्या google form मध्ये भरून पाठविणे.**

**(Link:www.unipune.ac.in/dept/fine_arts/centre_for_performing_arts/cpa_webfiles/admission.htm)**

## ***नृत्य***

### शैक्षणिक अर्हता : कोणतीही पदवी + विशारद पूर्ण अथवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण किंवा बी.ए. (नृत्य)

१) **कथक :**

१) वंदना

२) तिनताल झपताल, रुपक - ठाठ, आमद, तोडे-तुकडे, परन तिहाई-गिनती कवित्त, चक्रदार परन, चक्रदार तिहाई, पढन्त इ.

३) मत्त, पंचम सवारी, रास ताल, आमद, तोडे, परन, तिहाई, पढन्त, इ.

४) तिनतालात झपतातल, रुपक, एकताल, बराबर, दुगुन, चौगुन, आठगुन तिहाई सहित पायावर व हातावर लावता येणे.

५) गतनिकास

६) गतभाव, तराणा, ठुमरी, भजन या गोष्टी करून दाखवणे.

२) **भरतनाटयम् :**
सर्व अडवू, अलारीपू (तिश्र/चतुश्र), पुष्पांजली/कौत्वम्, शर्ब्द, कीर्तनं, वर्णं, पदम् (वात्सल्य), जावळी/ श्रृंगार पदम्, तिल्लांना

## ***नाट्य***

## शैक्षणिक अर्हता : कोणतीही पदवी + किमान ६ नाटकांमध्ये अभिनय किंवा इतर जबाबदारीचा अनुभव अनिवार्य

**प्रात्यक्षिक परीक्षेसाठी :**

१) सोबत जोडलेल्या उता-यापैकी कुठल्याही एका उता-याचे सादरीकरण.

२) सोबत जोडलेल्या कोणत्याही एका कवितेचे पाठांतर म्हणून दाखविणे.

३) पूर्वी तुम्ही अभिनय केलेल्या कोणत्याही नाटकातील एखादा उतारा सादर करणे.

४) आपल्या आवडीचे एखादे मराठी गीत गुणगुणून दाखविणे.

५) नाटयक्षेत्रातील पूर्वानुभव आवश्यक.

६) आपण प्रत्यक्ष पाहिलेल्या कोणत्याही एका नाटकाचे नेपथ्यचित्र कागदावर काढून ठेवावे व ते दाखविणे.

(Link : https://campus.unipune.ac.in)

**विभागप्रमुख**
ललित कला केंद्र, गुरुकुल
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ